देशोन्नती

# विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शारीरिक स्वच्छता महत्त्वाचा घटक

## निवाडा येथील रासेयो शिबिरात बी.एस्सी.सूक्ष्मजीवशास्त्र व रासेयो विद्यार्थ्यांकडून शालेय विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**लातूर** ▬ येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयोच्या वतीने रेणापूर तालुक्यातील निवाडा येथे रासेयो शिबिराचे आयोजन करण्यात आले असून सदरील शिबिराच्या चौथ्या दिवशी पहिली ते सातवी या शालेय विद्यार्थ्यांना बी. एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र व रासेयो विद्यार्थ्यांनी ' शारीरिक स्वच्छतेचे ' महत्त्व सांगून त्यांच्यात जनजागृती केली. सदरील शिबिरामध्ये सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे, डॉ. महेश करळे यांनीही शरीर, शरीराची नैसर्गिक रचना व आरोग्य प्रतिकारकशक्ती याबद्दल माहिती दिली. तसेच बी.एस्सी. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी सुजाता सराफ हिने जंतू कशा पद्धतीने शरीरामध्ये जाऊ शकतात आणि त्यामुळे रोग कसे निर्माण करू शकतात व हे रोग होऊ नये म्हणून कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात, याबद्दल प्रत्यक्ष सखोल अशी माहिती दिली. याप्रसंगी रासेयो



कार्यक्रमाधिकारी डॉ. श्रेयस माहुरकर, प्रा. राहुल जाधव तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रा. पूजा सोनसाळे व हालसे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

देशोन्नती

# प्रायोजित आण्विक जीवशास्त्रातील तंत्रावर आधारित तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ▪ येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, हाय - मीडिया लॅबॉरेटरिज प्रा. लि. मुंबई, मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी ऑफ इंडिया आयआयसी आणि आयक्यूएसी, डी. एस. सी. एल. यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२२ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या प्रायोजित आण्विक जीवशास्त्रातील तंत्रावर आधारित या विषयावर होणाऱ्या तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून हाय - मीडिया लॅबॉरेटरिज प्रा. लि. मुंबई येथील मनोजकुमार बोरसे, सूक्ष्मजीवशास्त्र



कार्यशाळा समन्वयक डॉ. महेश कराळे व प्रा. शैलजा धुतेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी साधन व्यक्ती मनोजकुमार बोरसे म्हणाले की, प्रायोजित आण्विक जीवशास्त्रातील तंत्रावर विद्यार्थ्यांनी, संशोधकांनी संशोधन केले पाहिजे. कारण या विषयाच्या अनुषंगाने अनेक संधी आहेत, त्या संधीचे सोने केले पाहिजे.

उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे म्हणाले की, महाविद्यालयात इतर विभागांप्रमाणे सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विद्यार्थी हे दरवर्षी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येतातच. याचे मुख्य कारण म्हणजे विद्यार्थ्यांच्या भावी उज्ज्वल

गुणवत्तेबरोबर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांना त्या-त्या विषयाचे अद्ययावत ज्ञान सातत्याने दिले जाते.

प्रास्ताविकातून डॉ. राहुल मोरे यांनी कार्यशाळा घेण्यामागची भूमिका विशद केली तर आभार डॉ. महेश कराळे यांनी मानले. सूत्रसंचालन वैष्णवी देवगावकर यांनी केले. कार्यशाळा आयोजित करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांचेही सहकार्य लाभले.

या प्रसंगी डॉ. कोमल गोमारे, प्रा. शीतल पाटील, प्रा. पूजा सोनसाळे, डॉ. रामशेट्टी शेटकार, संतोष सूर्यवंशी, अक्षय कुलकर्णी, अशोक मदने, माधव सूर्यवंशी यांच्यासह आदि प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी

मराठवाडा नेता

# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप

लातूर, दि. २२ :....

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, हाय - मीडिया लॅबॉरेटरिज प्रा.लि.मुंबई, मायक्रोबायोलॉजिस्ट सोसायटी ऑफ इंडिया आयआयसी आणि आयक्यूएसी,डी.एस.सी.एल यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१९ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२२ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'प्रायोजित आण्विक जीवशास्त्रातील तंत्रे' या विषयावरील तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप झाला. या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे हाय - मीडिया लॅबॉरेटरिज प्रा.लि.मुंबई येथील मनोजकुमार बोरसे,सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे, कार्यशाळा समन्वयक प्रा.शैलजा धुतेकर व डॉ.महेश कराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



याप्रसंगी मनोजकुमार बोरसे असे म्हणाले की,सदरील तीन दिवसीय कार्यशाळेतून प्रायोजित आण्विक जीवशास्त्रातील तंत्रे,त्या अनुषंगाने मिळालेले अद्ययावत ज्ञान व माहिती याविषयी विद्यार्थ्यांनी,संशोधकांनी भावी काळात संशोधन केले पाहिजे. कारण या विषयाच्या अनुषंगाने अनेक संधी आहेत.दयानंदच्या विद्यार्थ्यांचा उत्साह आणि शिकण्याची इच्छा प्रचंड अशी आहे, त्यांनी भविष्यात अत्यंत जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाने आपली गुणवत्ता, प्रगती सिद्ध करावी.

अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की, या कार्यशाळेतील ज्ञानाचा उपयोग जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी करून घ्यावा व भविष्यातील संधीचा फायदा करण्यासाठी याचा उपयोग करावा.

प्रा.शैलजा धुतेकर यांनी कार्यशाळेचा आढावा व महत्त्व सांगितले तर आभार डॉ.राहुल मोरे यांनी मानले.सूत्रसंचालन वैष्णवी देवगावकर यांनी केले.यावेळी आत्मजा सूर्यवंशी, अरूंधती दापेकर, दीपाली बर्डे या विद्यार्थ्यांनीने कार्यशाळेतील अनुभव मनोगतातून व्यक्त केले. प्रमुख मान्यवरांच्या हस्ते कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आली.कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांचेही अनमोल सहकार्य लाभले. याप्रसंगी प्रा.शितल पाटील, प्रा.पुजा सोनसाळे, डॉ. रामशेट्टी शेटकार, संतोष सूर्यवंशी, अशोक मदने, माधव सूर्यवंशी, हालसे यांच्यासह आदि प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

देशोन्नती

# गुणवत्तेची पंढरी असलेल्या दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे विद्यापीठ परीक्षेत नेत्रदीपक यश

## विद्यापीठाच्या मेरिटच्या यादीत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासह दयानंद विज्ञानचे एकूण ८ विद्यार्थी

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** ▬ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी -२०२२ या परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयातील एम. एस्सी. भौतिकशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान अशा पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षेच्या गुणवत्ता यादीत येऊन 'दयानंद'ने लातूर शैक्षणिक 'पॅटर्न' वृद्धिंगत करीत आपला दबदबा विद्यापीठात कायम राखलेला आहे.

यात एम.एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र द्वितीय वर्षातील लांडगे दीक्षा मनोहर ही विद्यार्थिनी ९४.७२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर भालेकर पूजा दत्तात्रेय या विद्यार्थिनीने ८९.३६ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आणि भालेकर ममता राजेंद्र ही विद्यार्थिनी ८८.०० टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आली. एम. एस्सी. भौतिकशास्त्र या द्वितीय वर्षातील मठपती मनीषा वीरभद्र ही विद्यार्थिनी ९५.९६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर यतिंद्र रत्नेश दीक्षित या विद्यार्थ्याने ९५.३२ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आणि शेख नाझिया बेगम वली मोहम्मद ही विद्यार्थिनी ९३.९६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आली. तसेच एम.एस्सी.जैवतंत्रज्ञान या द्वितीय वर्षातील दळवी अंकिता दत्तात्रेय ही विद्यार्थिनी ९३.६६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर जाधव मयूरी संतराम या विद्यार्थिनीने ९२.४२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात द्वितीय क्रमांक मिळविला.



प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यावेळी बोलताना म्हणाले की, दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयाबरोबर दयानंद विज्ञान महाविद्यालय हे लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नमधील गुणवत्तेची पंढरीच असून शिक्षण संस्थेनी, महाविद्यालयानी आजपर्यंत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येण्याची उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखलेली आहे. सुसज्ज इमारत, ग्रंथसंपन्न ज्ञानाचे भांडार असलेले ग्रंथालय, तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक आणि त्यांची मेहनत, संशोधनावर भर, अभ्यासक्रमावर आधारित वेगवेगळया कार्यशाळा, सेमिनार, अतिथी व्याख्यान आणि सर्व सोयी सुविधांनीयुक्त अशा सर्व शैक्षणिक वातावरणामुळे विद्यार्थ्यांनी हे घवघवीत यश संपादन केलेले आहे आणि दयानंदचे हजारो विद्यार्थी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा वेगवेगळया स्तरावर कार्यरत आहेत, याचा महाविद्यालयास व संस्थेस पूर्णता अभिमान आहे.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, नॅक समन्वयक डॉ. रवी सोळुंके, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, संजय तिवारी, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ललित ठाकरे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे, जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. कोमल गोमारे, डॉ. विश्वनाथ मोटे, कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, डॉ. महादेव पंडगे, प्रा. श्वेता लोखंडे, डॉ. महेश करळे, प्रा. लहु काथवटे, प्रा. मंगेश आवाळे, प्रा. धनंजय मुंगळे, प्रा. वैष्णवी चांडक, प्रा. संध्या जाधव, प्रा. शैलजा धुतेकर, प्रा. शीतल पाटील, प्रा. पूजा सोनसाळे, प्रा. संध्याराणी टेकाळे, प्रा. पूजा नागिमे, प्रा. मुक्ता माने, प्रा. शर्मिला कौळासकर, प्रा. मयुरी जाधव, प्रा. अवंती बिडकर, डॉ. फिरदोस बिरादार यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

दैनिक आनंद नगरी
सकारात्मक विचारांचे
Tuesday 2022/12/13

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे विद्यापीठ परीक्षेत नेत्रदीपक यश

## प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासह दयानंद विज्ञानचे एकूण ८ विद्यार्थी

**लातूर (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी –२०२२ या परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयातील एम.एस्सी.भौतिकशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान अशा पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षेच्या गुणवत्ता यादीत येऊन दयानंदने लातूर शैक्षणिक पॅटर्न वृद्धिंगत करीत आपला दबदबा विद्यापीठात कायम राखलेला आहे.



यामध्ये एम.एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र द्वितीय वर्षातील लांडगे दीक्षा मनोहर ही विद्यार्थीनी ९४.७२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर भालेकर पूजा दत्तात्रेय या विद्यार्थीनीने ८९.३६ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आणि भालेकर ममता राजेंद्र ही विद्यार्थीनी ८८.०० टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आली.एम.एस्सी.भौतिकशास्त्र या द्वितीय वर्षातील मठपती मनीषा वीरभद्र ही विद्यार्थीनी ९५.९६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर यतिंद्र रत्नेश दीक्षित या विद्यार्थ्याने ९५.३२ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आणि शेख नाझिया बेगम वली मोहम्मद ही विद्यार्थीनी ९३.९६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आली. तसेच एम.एस्सी.जैवतंत्रज्ञान या द्वितीय वर्षातील दळवी अंकिता दत्तात्रेय ही विद्यार्थीनी ९३.६६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर जाधव मयूरी संतराम या विद्यार्थिनीने ९२.४२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात द्वितीय क्रमांक मिळविला. या यशासंदर्भात प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड म्हणाले की, दयानंद शिक्षण संस्थे अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयाबरोबर दयानंद विज्ञान महाविद्यालय हे लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नमधील गुणवत्तेची पंढरीच असुन शिक्षण संस्थेनी, महाविद्यालयानी आजपर्यंत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येण्याची उज्वल यशाची परंपरा कायम राखलेली आहे. या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी,सचिव रमेश बियाणी,संयुक्त सचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, नॅक समन्वयक डॉ.रवी सोळुंके, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे,संजय तिवारी,भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.ललित ठाकरे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे , जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे,डॉ.विश्वनाथ मोटे,कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ.महादेव पंडगे,प्रा.श्वेता लोखंडे, डॉ.महेश करळे,प्रा.लहु काथवटे, प्रा.मंगेश आवाळे,प्रा.धनंजय मुंगळे,प्रा.वैष्णवी चांडक, प्रा.संध्या जाधव,प्रा.शैलजा धुतेकर, प्रा.शितल पाटील, प्रा.पुजा सोनसाळे प्रा.संध्याराणी टेकाळे, प्रा.पूजा नगिमे,प्रा.मुक्ता माने, प्रा.शर्मिला कौळासकर , प्रा.मयूरी जाधव,प्रा.अवंती बिडकर, डॉ.फिरदोस बिरादार यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

पुण्य नगरी

# 'दयानंद विज्ञान'चे विद्यार्थी विद्यापीठ परीक्षेच्या गुणवत्ता यादीत

**लातूर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२२ या परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयातील एम.एस्सी.भौतिकशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान अशा पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत येऊन दयानंदचा लातूर शैक्षणिक पॅटर्न वृद्धिंगत केला आहे.

एम.एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र द्वितीय वर्षातील लांडगे दीक्षा मनोहर ही विद्यार्थीनी ९४.७२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात प्रथम, तर भालेकर पूजा दत्तात्रेय ८९.३६ टक्के गुण घेऊन द्वितीय आणि भालेकर ममता राजेंद्र ८८.०० टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आली. एम.एस्सी.भौतिकशास्त्र या द्वितीय वर्षातील मठपती मनीषा वीरभद्र ही विद्यार्थीनी ९५.९६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली, तर यतिंद्र रत्नेश दीक्षित या विद्यार्थ्याने ९५.३२ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आणि शेख नाझिया बेगम वली मोहम्मद ही विद्यार्थीनी ९३.९६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आली. याचबरोबर एम.एस्सी.जैवतंत्रज्ञान या द्वितीय वर्षातील दळवी अंकिता दत्तात्रेय ही विद्यार्थीनी ९३.६६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर जाधव मयुरी संतराम या विद्यार्थिनीने ९२.४२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात द्वितीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, नॅक समन्वयक डॉ. रवी सोळुंके, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, संजय तिवारी, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ललित ठाकरे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे, जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. कोमल गोमारे, डॉ. विश्वनाथ मोटे, कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, डॉ. महादेव पंडगे, प्रा. श्वेता लोखंडे, डॉ. महेश करळे, प्रा. लहु काथवटे, प्रा. मंगेश आवाळे, प्रा. धनंजय मुंगळे, प्रा. वैष्णवी चांडक, प्रा. संध्या जाधव, प्रा. शैलजा धुतेकर, प्रा. शितल पाटील, प्रा. पुजा सोनसाळे, प्रा. संध्याराणी टेकाळे, प्रा. पूजा नगिमे, प्रा. मुक्ता माने, प्रा. शर्मिला कोळसकर, प्रा. मयुरी जाधव, प्रा. अवंती बिडकर, डॉ. फिरदोस बिरादार आदींनी अभिनंदन केले.




Smart Latur Edition
Dec 13, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

आदर्श गावकरी

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे विद्यापीठ परिक्षेत नेत्रदीपक यश

## विद्यापीठाच्या मेरिटच्या यादीत ८ विद्यार्थी झळकले










**लातूर** / प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडतर्फे घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२२ परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयातील एम.एस्सी. भौतिकशास्त्र, सूक्ष्म जीवशास्त्र आणि जैवतंत्रज्ञान अशा पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षेच्या गुणवत्ता यादीत येऊन दयानंदने लातूर शैक्षणिक पॅटर्न वृद्धिंगत करत आपला दबदबा विद्यापीठात कायम राखलेला आहे.

त्यामध्ये एम.एस्सी. सूक्ष्म जीवशास्त्र द्वितीय वर्षातील दीक्षा लांडगे ही विद्यार्थीनी ९४.७२ टक्के गुण घेऊन प्रथम आली तर पूजा भालेकर या विद्यार्थीनीने८९.३६ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला. ममता भालेकर हिने ८८ टक्के गुण घेऊन तृतीय आली. एम.एस्सी. भौतिकशास्त्र या द्वितीय वर्षातील मनिषा मठपती ही विद्यार्थीनी ९५.९६ टक्के गुण घेऊन प्रथम आली तर रत्नेश दीक्षित या विद्यार्थ्याने ९५.३२ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आणि नाझिया शेख ही ९३.९६ टक्के गुण घेऊन तृतीय आली. तसेच, एम.एस्सी. जैवतंत्रज्ञान या द्वितीय वर्षातील अंकिता दळवी ही विद्यार्थीनी ९३.६६ टक्के गुण घेऊन प्रथम आली तर मयूरी जाधव हिने ९२.४२ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रम ांक मिळविला.

यावेळी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड म्हणाले की, दयानंद विज्ञान महाविद्यालय हे लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नमधील गुणवत्तेची पंढरीच असुन शिक्षण संस्थेनी, महाविद्यालयानी आजपर्यंत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत येण्याची उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखलेली आहे. सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा सर्व शैक्षणिक वातावरणामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केलेले आहे आणि दयानंदचे हजारो विद्यार्थी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा वेगवेगळ्या स्तरावर कार्यरत आहेत,याचा महाविद्यालयास व संस्थेस पूर्णता अभिमान आहे,असे ते म्हणाले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललित शाह, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, नॅक समन्वयक डॉ.रवी सोळुंके, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, संजय तिवारी, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ.ललित ठाकरे, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे, जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे, डॉ.विश्वनाथ मोटे, कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, डॉ.महादेव पंडगे, प्रा.श्वेता लोखंडे, डॉ.महेश करळे, प्रा.लहु काथवटे, प्रा.मंगेश आवाळे, प्रा.धनंजय मुंगळे, प्रा.वैष्णवी चांडक, प्रा.संध्या जाधव, प्रा.शैलजा धुतेकर, प्रा.शितल पाटील, प्रा.पुजा सोनसाळे, प्रा.संध्याराणी टेकाळे, प्रा.पूजा नगिमे,प्रा.मुक्ता माने, प्रा.शर्मिला कौळासकर, प्रा.मयूरी जाधव, प्रा.अवंती बिडकर, डॉ. फिरदोस बिरादार यांच्यासह विभाग प्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

Auranagabad Edition
13 Dec, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

दैनिक सकारात्मक विचारांचे
आनंद नगरी
Thursday 2022/12/08

# दयानंद विज्ञान महाविद्यालयास नॅकचे A+ मानांकन

## स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठांतर्गत ३.४० सीजीपीए सह A+ असलेले पहिले महाविद्यालय



**लातूर (प्रतिनिधी)–** लातूरच्या शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक व शैक्षणिक गुणवत्तेची पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद अर्थात नॅकचा ३.४० च्या सीजीपीएसह A + हा ग्रेड नुकताच मिळालेला असून या महाविद्यालयाची नॅकला सामोरे जायची ही तृतीय वेळ होती. या नॅकच्या मूल्यांकनात महाविद्यालयास ३.२१ सीजीपीए मिळून नॅकचा अ दर्जा दि.१४ व १५ मार्च २०२२ रोजी नॅक पिअर टिमकडून केलेल्या मूल्यांकनात प्राप्त झाला होता. परंतु महाविद्यालयाने नॅककडे पुन्हा अपिल केले,त्याचा निकाल दि.०७ डिसेंबर २०२२ रोजी आला.त्यामध्ये सीजीपीए ३.२१ वरून ३.४० अशी गुणात्मक वाढ झाली व महाविद्यालयास A दर्जावरून A + हा दर्जा नॅकने घोषित केला त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात लातूरच्या दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विज्ञान महाविद्यालयाने गुणवत्तेत भरारी निर्माण केली आहे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड अंतर्गत ३.४० सीजीपीए मिळवणारे दयानंद विज्ञान महाविद्यालय हे पहिलेच महाविद्यालय आहे. त्यामुळे महाविद्यालय व संस्थेसाठी ही एक अभिमानाची बाब आहे. या घवघवीत यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, उपाध्यक्ष ललितभाई शाह,उपाध्यक्ष रमेशकुमार राठी,सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य व आयक्यूएसी समन्वयक डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, नॅक समन्वयक डॉ.रवी वसंतराव सोळुंके, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, नॅक समन्वय समितीतील सर्व सदस्य, संगणक तज्ज्ञ राजेसाहेब पांचाळ,प्रा.सचिन पतंगे प्रा.अमोल सांजेकर, विष्णू नाईकवाडे, मोहसीन शेख यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि वस्तीगृह अधीक्षक आदी सर्वांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

पुरोगामी विचाराचे
एकमत

## ►स्वाराती मराठवाडा विद्यापीठांतर्गत ३.४० सीजीपीए स

# दयानंद विज्ञान महाविद्यालयास 

**लातूर : प्रतिनिधी**



दयानंद विज्ञान महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद अर्थात नॅकचा ३.४० च्या सीजीपीएसह अ+ हा ग्रेड नुकताच मिळालेला आहे. महाविद्यालयाची नॅकला सामोरे जायची ही तृतीय वेळ होती.या नॅकच्या मूल्यांकनात महाविद्यालयास ३.२१ सीजीपीए मिळून नॅकचा अ दर्जा दि. १४ व १५ मार्च २०२२ रोजी नॅक पिअर टिमकडून केलेल्या मूल्यांकनात प्राप्त झाला होता. परंतु महाविद्यालयाने नॅककडे पुन्हा अपिल केले. त्याचा निकाल दि. ७ डिसेंबर २०२२ रोजी आला.त्यामध्ये सीजीपीए ३.२१ वरून ३.४० अशी गुणात्मक वाढ झाली व महाविद्यालयास अ दर्जावरून अ+ हा दर्जा नॅकने घोषित केला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड अंतर्गत ३.४० सीजीपीए मिळवणारे दयानंद विज्ञान महाविद्यालय हे पहिलेच महाविद्यालय आहे. त्यामुळे महाविद्यालय व संस्थेसाठी ही एक अभिमानाची बाब आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य व आयक्यूएसी समन्वयक डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, नॅक समन्वयक डॉ. रवी वसंतराव सोळुंके यांनी सांगितले.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीर
अरविंदराव सोनव
शाह, उपाध्यक्ष
रमेश बियाणी,
जैन, कोषाध्यक्ष
जयप्रकाश दरगड,
समन्वयक डॉ.
समन्वयक डॉ.र
कार्यालयीन अधी
कनिष्ठ लघुलेख

मराठवाडा नेता

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठीच रूसाच्या अनुदानाचा सुयोग्य वापर

## ■ दयानंद विज्ञान महाविद्यालयास रूसा प्रत्यक्ष पडताळणी भेट

*लातूर (म. नेता) :....*

शिक्षण संस्था शिक्षण संस्था, दयानंद विज्ञान महाविद्यालय हे केवळ मराठवाड्यातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील गुणवत्तेचा बालेकिल्लाच आहे. कारण लातूर शैक्षणिक पॅटर्नमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या या शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या सर्वच महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जातात, हे सर्वपरिचितच आहे. याचबरोबर दयानंद विज्ञान महाविद्यालयास रूसाचे जे २ कोटीचे अनुदान मिळालेले आहे, त्याची योग्य पडताळणी केली असता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विविध पायाभूत सुविधा करण्यात आलेल्या आहेत, त्याचा सुयोग्य वापर करण्यात आलेला आहे. सुसज्य वस्तिगृहाचे बांधकाम, आकर्षक क्रीडा मैदान, प्रशस्त इमारत, सर्वच विभागातील उपकरणे, संशोधन, सर्व सुविधांनी युक्त असलेल्या वर्ग खोल्या,सेमिनार हॉल




अशा सर्वच बाबतीत महाविद्यालयाने दर्जेदार व सर्वोत्कृष्ट कार्य केलेले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र मुंबई येथील रूसाचे डेप्युटी डायरेक्टर राहुल कदम यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०२ डिसेंबर २०२२ रोजी रुसा प्रत्यक्ष पडताळणी भेट देण्यात आली.यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, रूसा समन्वयक डॉ.राहुल मोरे, सी.ए.एस.एस.बोरा, गजानन पसारकर, शांतेश्वर बरबडे, राजकुमार गुणाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रूसाचे डेप्युटी डायरेक्टर राहुल कदम यांनी प्रत्यक्ष विभागात जाऊन पाहणी करत असताना रूसा अंतर्गत उपकरणाच्या साहाय्याने विद्यार्थी काम करत आहेत, त्यामुळे त्यांचे कौतुक केले आणि समाधानही व्यक्त केले. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेश बियाणी आणि संस्थेचे सर्वच पदाधिकारी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमी पुढाकार घेऊन कार्य करतात ही कौतुकास्पद बाब आहे, असेही म्हटले.

याप्रसंगी शैक्षणिक उपक्रमशील उपप्राचार्य डॉ.एस.एस.बेल्लाळे, वित्त विभाग डॉ.ललित ठाकरे, रूसा खरेदी अधिकारी डॉ.चंद्रशेखर स्वामी, रूसा खरेदी सभासद डॉ. श्रेयस माहुरकर, नॅक समन्वयक डॉ.रवी सोळुंके, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, संजय तिवारी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

दिव्य लोकप्रभा
Sun 04-12-2022
Page No. 8

# दयानंद महाविद्यालय मराठवाड्याचे नव्हे तर

# देशातील गुणवत्तेचा बालेकिल्ला-राहुल कदम

लातूर । प्रतिनिधी

शिक्षण संस्था शिक्षण संस्था,दयानंद विज्ञान महाविद्यालय हे केवळ मराठवाड्यातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील गुणवत्तेचा बालेकिल्लाच आहे.कारण लातूर शैक्षणिक पॅटर्नमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या या शिक्षण संस्थेअंतर्गत असलेल्या सर्वच महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जातात,हे सर्वपरिचितच असुन याचबरोबर दयानंद विज्ञान महाविद्यालयास रूसाचे जे २ कोटीचे अनुदान मिळालेले आहे,त्याची योग्य पडताळणी केली असता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विविध पायाभूत सुविधा करण्यात आलेल्या आहेत,त्याचा सुयोग्य वापर करण्यात आलेला आहे.सुसज्य वस्तिगृहाचे बांधकाम, आकर्षक क्रीडा मैदान,प्रशस्त इमारत,सर्वच विभागातील उपकरणे, संशोधन,सर्व सुविधांनी युक्त असलेल्या वर्ग खोल्या, सेमिनार हॉल अशा सर्वच बाबतीत महाविद्यालयाने दर्जेदार व सर्वोत्कृष्ट कार्य केलेले आहे,असे प्रतिपादन महाराष्ट्र मुंबई येथील रूसाचे डेप्युटी डायरेक्टर राहुल कदम यांनी केले.



लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०२ डिसेंबर २०२२ रोजी रुसा प्रत्यक्ष पडताळणी भेट देण्यात आली.यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड, उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,रूसा समन्वयक डॉ.राहुलमोरे,सी.ए.एस.एस.बोरा,गजानन पसारकर, शांतेश्वर बरबडे, राजकुमार गुणाले यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी केला.

यावेळी उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी आभार मानले. याप्रसंगी शैक्षणिक उपक्रमशील डॉ.एस.एस.बेल्लाळे,वित्त विभाग डॉ.ललित ठाकरे, रूसा खरेदी अधिकारी डॉ.चंद्रशेखर स्वामी,रूसा खरेदी सभासद डॉ.श्रेयस माहुरकर,नॅक समन्वयक डॉ.रवी सोळुंके,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,संजय तिवारी यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

देशोन्नती

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांची रेणा साखर कारखाना येथे औद्योगिक शिक्षण सहल

देशोन्नती वृत्तसंकलन...

**लातूर** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालय अंतर्गत सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे बी.एस्सीच्या आणि रासेयो स्वयंसेवक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक अभ्यास व त्यात सूक्ष्मजीवांचे महत्त्व यासाठी रेणा सहकारी साखर कारखाना निवाडा, ता. रेणापूर येथे सहलीचे, भेटीचे आयोजन करण्यात आलेले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एस. दरगड यांच्या मार्गदर्शनाखाली सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. राहुल मोरे यांनी या सहलीचे आयोजन केले होते. सदरील सहलीचा मुख्य हेतू असा होता की, सूक्ष्मजीवशास्त्र पदवी विषयाच्या व रासेयो विद्यार्थ्यांना सूक्ष्मजीवांचा औद्योगिक क्षेत्रामध्ये कशा पद्धतीने उपयोग केला जातो व त्याच्यापासून वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. ज्याची की, बाजारामध्ये खूप जास्त प्रमाणात मागणी असते. जसे की अल्कोहोल, स्पिरिट, दुग्धजन्य पदार्थांमध्येसुद्धा सूक्ष्मजीवांचा वापर केला जातो.जसे की, पनीर चीज हे पदार्थ बनवण्यामध्येसुद्धा सूक्ष्मजीवांची महत्त्वाची भूमिका असते. तसेच खूप सारे फर्मेंटेड प्रॉडक्ट हे सूक्ष्मजीवांचा वापर करूनच बनवले जातात. सदरील सहलीमध्ये विद्यार्थ्यांना उसापासून साखर बनवणे तसेच उसाच्या मळीपासून ईस्टचा वापर करून अल्कोहोल फर्मेंटेशन कसे केले जाते व फर्मेंटेड ब्रोथपासून डिस्टिलेशन या प्रक्रियेद्वारे अल्कोहोल कशा पद्धतीने वेगळे केले जाते याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या औद्योगिक अभ्यास सहलीमध्ये रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. श्रेयस माहुरकर, प्रा. राहुल जाधव, डॉ. महेश करळे, प्रा. पूजा सोनसाळे, हालसे यांचा महत्त्वाचा वाटा होता. या सहलीमध्ये एकूण ६८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व पाच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी होते.

